जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२
वर्ष : ६५ अंक दुसरा

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक



RNI Reg. No. 32307/79 मूल्य : ९५/-
मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य हैदराबाद

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै ते सप्टेंबर २०२२
आषाढ श्रावण भाद्रपद १९४४

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
डॉ. शोभा देशमुख
डॉ. गीता काटे
प्रा. मीना जागीरदार
श्रीमती विद्या मक्तल
श्री. माधव रामराजे चौसाळकर

**अतिथी संपादक**

डॉ. अनुजा जोशी

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................ ५

१. **समकालीन वेधाचा सुंदर प्रवास**
डॉ. अनुजा जोशी ........................................................ ७

२. **जाणीव-नेणिवेच्या आभाळवाटांच्या आर्तोत्सव (शंकर रामाणी-काव्यशैली)**
आश्लेषा महाजन ........................................................ १४

३. **शंकर रामाणी यांची कविता**
मंगेश नारायणराव काळे ........................................................ २३

४. **शंकर रामाणी यांच्या कवितेतील ऋतुसंवेदन आणि गूढगुंजन**
सुनील शिनखेडे ........................................................ २९

५. **शंकर रामाणींच्या कवितेतील 'प्रेमभावना' - एक सर्जक चकवा**
अरुण म्हात्रे ........................................................ ३८

६. **शंकर रामाणी यांची निसर्गकविता**
प्रा. विनायक लक्ष्मण बापट ........................................................ ५१

७. **'कवी तळ ढवळतो तेव्हा....'**
श्रीकांत देशमुख ........................................................ ६१

८. **रामाणी यांच्या चिमण्यांचे पुनश्च सहर्ष स्वागत**
अविनाश साळापुरीकर ........................................................ ६६

पुस्तक परिचय :
१. **बालमनाला मोहवणारी काव्यरूप 'सूर्यफुले'**
स्नेहा अमोल मोरजकर ........................................ ७१

२. **शंकर रामाणींचे भावविश्व व्यक्त करणारी 'कातरवेळ'**
पूर्वा पंडित वस्त ........................................ ७५

३. **'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श**
डॉ. विनय मडगांवकर ........................................ ८६

४. **विविधांगी रूपांनी नटलेला 'पालाण'**
स्नेहा संभाजी जांबोटकर ........................................ ९७

५. **गूढगर्भी कवितेचा आविष्कार 'दर्पणीचे दीप'**
प्रा. चिन्मय मधू घैसास ........................................ १०४

६. **मनाच्या गाभ्यातून - 'गर्भागार'**
राधिका रा. नागवेकर ........................................ १०९

**ग्रंथ परीक्षण :**
१. **साधार, सप्रमाण, संदर्भमूल्ययुक्त दस्तऐवज**
डॉ. सोमनाथ कोमरपंत ........................................ ११६

२. **पत्रांच्या सोबतीने गायलेले 'एकट्याचे गाणे'**
डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी ........................................ ११९

३. **''रामाणी'': शंकर रामाणी नावाच्या गूढाचा वेध**
प्रा. अरुणा गानू........................................ १२४

**लेखक परिचय** ........................................ १२८

**स्वागत नव्या पुस्तकांचे** ........................................ १३२

पुस्तक परिचय : २

# शंकर रामाणींचे भावविश्व व्यक्त करणारी 'कातरवेळ'



**पूर्वा पंडित वस्त**

गोमंतकाला समृद्ध अशी काव्यपरंपरा लाभलेली आहे. बा. भ. बोरकर, द. आ. कारे अशा प्रतिथयशी कवींनंतर १९३७ पासून वयाच्या अवघ्या १४/१५ व्या वर्षी लेखन करणाऱ्या शंकर रामाणींच्या कविता अनेक मासिकांमधून प्रसिद्ध झाल्या. इ. स. १९४९ साली 'सूर्यफुले' हा त्यांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला आणि दहा वर्षांनी इ. स. १९५९ मध्ये'कातरवेळ' हा संग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहाला नामवंत मराठी कवी पु. शि. रेगे यांची प्रस्तावना लाभली. या कवितेसंदर्भात पु. शि. रेगे म्हणतात, 'ती संपूर्णपणे सांकेतिक आहे. पुष्कळसे न सांगताही सांगितले आहे असे वाटायला लावणारी आहे'[१]. निसर्गरुपांच्या माध्यमातून भिन्न भावनांचे आविष्करण या कवितांमध्ये झाल्याने गूढतेचे वलय या कवितांना लाभलेले आहे ज्यातून अनेकार्थता सूचित होते.

प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या शंकर रामाणींच्या कविता उदासीनतेने ग्रासलेल्या मनोवस्थेचे चित्रण 'आली वादळाची रात' या कवितेमध्ये कवी व्यक्त करतात. आपल्या प्रिय व्यक्तीच्या दर्शनास आसुसलेली मनोवृत्ती, तिच्या नसण्याने जीवनात निर्माण झालेली पोकळी व्यक्त करत कवी म्हणतात,

*''पणतीच्या प्रकाशात*
*धीर वाटला मनास.*
*वात विझली; चालली*
*एकला उदास*
*माझा संपेना प्रवास''* [२]

प्रिय व्यक्तीविना आपलं जगणं निरर्थक आहे असा सूर या कवितेमधून व्यक्त झाला आहे. कवी तिच्या भेटीचा ध्यास व्यक्त करताना लिहितात,

*''परि तुझ्या दर्शनाचा*
*अंतरात ध्यास''* [३]

तसेच आपल्या प्रिय व्यक्तीकडे ओढणाऱ्या मनाचे चित्रण 'तुझ्याकडे' या

कवितेमध्येही खालीलप्रमाणे करतात.

*"नागिणीच्या वळणांची*
*वाट माझी चढणीची*
*खोल अंतरांत तुला*
*तळमळ भेटण्याची"* [४]

'रात्र करि जागरण' या कवितेत गाढ रात्रीचे सौंदर्य चित्रित करतात तसेच अमावस्येच्या दिनी रात्रीची आणि चंद्राची तातातून दाखवत 'रात्र' या प्रतिमेचा वापर करत प्रियकरापासून दुरावलेल्या प्रेयसीच्या मनोवस्थेचे चित्रण करतात. क्षणांना खुलवणारा तिचा अनुभव कवींना हुरहूर लावून गेला आहे. तिच्या सौंदर्याची भुरळ कवीला पडली आहे तसेच तिच्या नुसत्या हालचालींमुळे आपण अंतरी एक प्रेम भावना अनुभवली आहे असे 'क्षण हसल्या अंतरी' या कवितेत कवी म्हणतात,

*"क्षण एकच परि मधुर तुझी ती हालचाल जाहली*
*क्षण एकच मी धुंद कांहिंसें अनुभवलें अंतरीं"* [५]

'मी नाहिं तिला पाहिलें' या कवितेत कवी आपण तिला पाहिले नाही तरी तिला अनुभवल्याचा सूर व्यक्त करतात. तिला पाहिले नाही तरी तिच्या अस्तित्वाच्या खुणांमुळे 'आपण धुंद कांहिंसें अनुभविलें अंतरी' [७] असे कवी म्हणतात. कवी आपल्या प्रियाच्या बाह्य सौंदर्याच्या चित्रणाबरोबर तिच्याविषयी असलेली आंतरिक ओढही अशापद्धतीने वेगवेगळ्या कवितांमधून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात.

'तुझ्याकडे' या कवितेमध्ये, तुझ्या नुसत्या आठवणीने नव चैतन्य जागल्याचे कवी सांगतात.

*"परि तुझ्या आठवानें*
*स्फुरे आज गोड गाणें*
*शिणलेलें मन माझें*
*न्हालें नव्या चैतन्यांने"* [८]

निराशमय जीवनावर मात करण्यासाठी आपल्या प्रिय व्यक्तीची ओढ व्यक्त करतात.'उमलें स्वप्न पहाटें' या कवितेतूनही मदालसेच्या दर्शनाने जीवनातील अंधार, उदासीनता दूर झाल्याचे कवी सांगताना लिहितात,

*"कटाक्ष एकच करि बोथट उरिं उदासतेचे कांटे."* [९]

पुढे ते लिहितात,

*"नैराश्याचा गहन तिमिर अन् आपोआपच आटे."* [१०]

'नाते गोड जडावे' या कवितेत तिच्या दर्शनाने, 'उदासतेचें घन हृदयांतिल

आपोआप विरांवे' [११] असे कवी लिहितात. उदासीनता दूर सारण्यासाठी कवींच्या आयुष्यात असलेले तिचे स्थान या कवितांमधून अधोरेखित होते.

या प्रेम विषयक कवितांमधून आपल्या प्रेयसीची वर्णने कवी करताना दिसून येतात. 'क्षण हसल्या' या कवितेत ते लिहितात,

*''क्षण हंसल्या, क्षण फुलल्या, खुलल्या तुझ्या अधरपाकळ्या*
*नयनांच्या डोहांत चमकल्या चपल जरा मासळ्या*
*भुरभुरले क्षण वाऱ्यावरती कुरळ केश रेशमी*
*क्षणभर तूं तुजलाच पाडिलें गोड अशा संभ्रमीं''* [१२]

*'कधीं' या कवितेत,*
*''मंत्रमुग्ध नागसम मी अन्*
*भर रस्त्यांतच उभें रहावें*
*लांबसडक तव कुंतलपाशीं*
*चंचल माझें मन गुंतावें''* [१३]

अशा शब्दात तिच्या सौंदर्याचे वर्णन करतात. 'कधीं' या कवितेत तिच्या भेटीची आशा कवी व्यक्त करतात. अचानक कधीतरी आपली भेट व्हावी, आपले नाते आपल्याला उमजावे तरी न उमजल्यासारखे आपण वावरावे आणि प्रीतीचा चोर खेळ खेळावा असे कवी म्हणतात. 'नाते गोड जडावे' या कवितेतही प्रेयसीच्या सौंदर्याचे सामर्थ्य वर्णिताना कवी लिहितात,

*''नजरेच्या जाळ्यांत कुणाचें काळिज तूं पकडावें*
*कमलकरांनी केस मोकळे ऐटींतच झटकावे*
*सहज कधीं चापल्य मृगाचें चालीतून मिरवावें*
*चांचल्यच साक्षात् तुझ्या अन् वागण्यात प्रगटावें''* [१४]

'मीं कुणी एक पाहिली' या कवितेत वेगवेगळ्या प्रतिमांचा वापर करत तिच्या दर्शनाने आपण तृप्त झाल्याचे कवी सांगतात. स्त्री चित्रण करताना तिच्या बाह्य सौंदर्य दर्शनाने आपण तृप्त झाल्याचे कवी सांगतात. याविषयी डॉ. के. के. अहिरे लिहितात, 'कवी रामाणी यांनी त्यांच्या मनोदेवतेला निसर्ग प्रतिमा, उपमांद्वारे, नटविण्यात, सजविण्यात, खुलविण्यात कोणताही प्रकारचा संकोच बाळगलेला नाही.'[१५] स्त्री सौंदर्याचे चित्रण करताना कवी लिहितात,

*''मीं कुणी एक पहिली-*
*मध्यरात्रिसम काळ्या काळ्या,*
*लांबसडक कुरळ्या केसांची'*

*जी निज कुंतलपाशीं माझें*
*गुंतवून मन सहजच गेली!''* [१६]

स्त्री सौंदर्याचे वर्णन करताना बरीच साम्यस्थळे त्यांच्या वरील कवितांमधून दिसून येतात. या विषयी पु. शि. रेगे संग्रहाच्या प्रस्तावनेत लिहितात, 'ही निसर्गाच्या रंगरेषांवर, क्वचित् लहरींवर, पोसलेली आहे. तिच्यातील भावुकपणा जाणवतो. परंतु ती बिल्वरांची किणकिण आणि कुंतलांची भुरभुर यांच्या फारशी पलीकडे जात नाही. गाढ मिठीचे तिला वावडेच आहे.'[१७] डॉ. के. के. अहिरे त्यांच्या 'कातरवेळ' संग्रहातील प्रेमकवितेविषयी लिहितात, 'त्यांची वृत्ती कोणत्याही प्रकारे कामिक, वासनिक नाही.'[१८]

शंकर रामाणी गोमंतकीय असल्याकारणाने गोमंतकीय प्रदेशनिष्ठा त्यांच्या 'मध्यरात्रीच्या निवांत वेळी' सारख्या कवितेतून दिसून येते. माड-चुडतांचा (माडाच्या झावळ्यांचा) उल्लेख त्यांच्या कवितेत होतो. मध्यरात्रीचे चिंतन करताना ते म्हणतात,

*''प्रदीर्घ एक*
*जांभळी देऊन*
*बांधावरल्या ताठ माडांच्या*
*चुडतांवर*
*निजला वारा''* [१९]

'रात्र करी जागरण' या कवितेतही कवी म्हणतात की, कौलाच्या शेजेवर वारा खुशाल पेंगतो. कौल, माड या प्रादेशिक स्वरूपाच्या प्रतिमांचा वापर वारंवार होताना दिसून येतो. 'स्वैर भटकावे' या कवितेत गोमंतकीय कुळागरातील भटकंतीचा एक सुंदर असा चित्राविष्कार कवी करतात. 'तिन्ही काल' या कवितेत वाऱ्याच्या स्पर्शाने प्रफुल्लित झालेल्या भिन्न निसर्गरूपांचे चित्रण कवी करतात. या कवितेत भिन्न फुलांच्या प्रतिमा वापरत प्रियकराच्या येण्याने प्रफुल्लित झालेल्या प्रेयसीचे चित्रण कवी करतात. 'किनारा' या कवितेत प्रेमाच्या भाषेस ओठी खेळवणाऱ्या लाटांचे सुंदर असे वर्णन कवी खालील प्रमाणे करतात,

*''या लाटांचे कुंतल कुरळे*
*फेनफुलें वर शुभ्र माळिलीं*
*जवळपणाची, अनुरागाची*
*रोजचीच अन् भाषा अधरीं''* [२०]

कवी पुढे म्हणतात, या किनाऱ्याने युगायुगांचा अनुभव घेतला आहे.

अनेकांची पापे या लाटांनी धुतलेली आहे आणि तरीही किनारा शांत, अचल आणि विस्तीर्ण आहे, सामावून घेणार आहे. कवी निसर्ग प्रतिमांचे मानवीकरण करत मानवी मनोवृत्तीवर भाष्य करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. 'पलीकडे पैलतीरीं', 'रात्र करी जागरण', 'मध्यरात्रीच्या निवांत वेळी', 'मिटे रात्रीची पापणी', 'आली वादळाची रात' अशा अनेक कवितांमधून रात्रीवर मात करत प्रकाशमानतेकडे चालणारी वाट दर्शवणाऱ्या प्रवासासाठी 'रात्र' या प्रतिमेचा वारंवार वापर होताना दिसून येतो.

शंकर रामाणीची 'कातरवेळ' ही कविता कातरवेळचे निसर्गचित्र रेखाटताना दिसून येते. कातरवेळच्या अंधार तेजाचे मिलन आणि सूर्यनारायणाची सफर चौफेर तेज फाकत चालल्याचे कवी म्हणतात. कातरवेळी परतणाऱ्या श्रमिक जीवांबद्दल कवी बोलतात. कातरवेळेला तुळशीवृंदावना समोर देवचर्येत गुंतलेल्या सुवासिनी तसेच अगदी निष्ठेने भगवंताच्या मंगल प्रार्थनेत जुळलेल्या भाविक जीवांचा कवी उल्लेख करतात. कातरवेळेला साचलेला भयाण अंधार, रातकिड्यांचे रात्रसंगीत तसेच अंधाऱ्या रात्रीत जाणवणारे पोळलेल्या वसुंधरेच्या आशा गीताचे अस्पष्ट स्वर कवीला ऐकता येतात आणि कवी म्हणतो पोळलेल्या वसुंधरेच्या आशा गीताचे स्वर आपल्याला प्रकाशमय होण्यासाठी प्रेरणा देतात. जीवनाच्याही कातरवेळी भयाण काळोख अनुभवावा लागतो पण शेवटी एक रात्र सरल्याने जग प्रकाशमानही होते अशी आशावादी भूमिका कवी व्यक्त करताना दिसून येतात. 'मध्यरात्रीच्या निवांत वेळी' या कवितेत आत्मनिष्ठ स्वरूपाची उदासीनता कवी व्यक्त करतात. कवी म्हणतात उदासीन मनाने आशा निराशेचा रणसंग्राम आपण पाहतो आहे आणि या द्वंद्वात आशेचा विजय होतो. ते पुढे म्हणतात,

*''रात्र पोसते*
*गर्भाशयात*
*उद्याच्या रवीचें*
*सोनेरी तेज''*

यातून ते समाजमानसाला संदेशही देतात की सोनेरी तेज रात्रीवर मात करेल आणि नव्या युगाचे नवीन गाणे मंगल प्रभाती स्फुरेल. कितीही अंधार आयुष्यात आला तरी त्यावर मात करून नवीन जीवनाची सुरुवात करू असा आशावाद ते व्यक्त करतात. स्वशोध घेत चाललेला मागोवा कवी'माग' या कवितेतून व्यक्त करतात. हा मागोवा घेताना कवीचे एकाकी आयुष्य व उदासीनता प्रतीत होते. 'मिटे रात्रीची पापणी' या कवितेत दृश्यात्मकता दिसून येते. रात्रीच्या निसर्गाचे चित्र रेखाटत रात्रीवर मात करून प्रकाशमय जीवनाकडे झेप घेण्याचा प्रयत्न या कवितेतही दिसतो.

अंधारमय जीवनावर मात करणे हा आशय वारंवार त्यांच्या अन्य काही कवितांमध्ये आलेला दिसून येतो.

'पलीकडे पैलतीरीं' या कवितेतून तुटलेपणाची जाणीव आणि त्यामुळे निर्माण झालेली उदासीनता कवी व्यक्त करतात. गावापासून, घरापासून तुटलेले कवी म्हणतात की ऐलतीरीं असलेल्या मला पैलतीरी पोहचवण्यासाठी असलेली नावही पैलतीरींच आहे. पुन्हा मुळांकडे जुळवणारे सगळे पाश हरवलेले आहेत. आपल्या एकाकी अवस्थेचे चित्रण करताना कवी लिहितात,

*"सांज टळलेली;*
*आली – रेंगाळत रात*
*उरे विषण्ण एकटा*
*भोवती एकांत"* [२१]

'ऐन ग्रीष्मात फळली' या कवितेत कवी म्हणतात की कितीही प्रखर अनुभवांना आपण सामोरे जाऊ शेवटी आपल्याला एकाकी जळावं लागतं. आपल्या भावनांना बांधा घालावा लागतो. निसर्ग हे प्रतीक म्हणून आलेले येथे दिसून येते. आपल्या वेदनेच्या डहाळीला आपली व्यथा फुल स्वरूप झाली असे कवी म्हणतात. अंधाराला जसा नक्षत्रांचा मोहर येतो तसेच आपल्या वेदनेच्या डहाळीला फुले आलेली आहेत. एकांतात रात्री मौन फुलले आहे. या एकांतात पारिजात फुलतो आणि आपल्या सुगंधाने दुःख गंधित करतो. या कवितेत कवी दुःखमय अशी आपली मनस्थिती प्रतीकांच्या साहाय्याने शब्दबद्ध करतात. वेदनेची डहाळी जरी असली तरी तिचे फुल उमलले आहे, गर्द अंधार जरी असला तरी त्यात नक्षत्र मोहरले आहे तसेच पारिजात दुःख व्यक्त करत असले तरी ते गंधित आहे. वेदना जरी आहे तरी त्याला उमललेली प्रत्येक प्रतीके आशावादी आहेत. एकाकी अवस्थेत वेदनेला फुल स्वरूप देणारा कवी या कवितांमधून दिसून येतो.

'पूजा' या कवितेत बाग बहरली असतानाही, रिक्त ताटी हाती घेऊन पूजा आटोपलेल्या स्त्रीच्या चेहऱ्यावरील समाधान, असे एकूण दृश्य कवी चित्रित करतात. फुलाविना पूजेचे समाधान दर्शवत एक व्यापक अर्थ कवी मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यांची आध्यात्मवादी दृष्टी या कवितेत डोकावताना दिसून येते. 'एक अभंग' या कवितेत अव्यक्त अशा दुःखाची भाषा जरी अंतर्मनात आहे तरी अनंत अशा अज्ञात सुखाच्या वाटेवर आपली पावले वळली आहेत असे कवी सांगतात. 'कधीं कधीं' या कवितेत तिन्हीसांजेच्या वेळी, येणाऱ्या संकटाची चाहूल कशी उदासीनता निर्माण करते हे कवी सांगण्याचा प्रयत्न करतात. आपल्या मनःस्थितीचे

चित्रण करतात. 'शामल कोवळी' या कवितेतही सांजवेळचे दर्शन कवी घडवतात. सांजवेळचे कोवळे स्तब्ध वातावरण चित्रित करतात. या सांजवेळेच्या वातावरणात एकांतात रमलेला कवी म्हणतो, हृदयात मौन गहन, अथांग! [२२]. 'वाट असावी' या कवितेत सुखावणारी खट्याळ, चंचल, मन मोहरणारी वाट असावी असे कवी म्हणतात आणि शेवटच्या काव्यपंक्तीत अगदी विरोधाभास दिसून येतो. कवी उदास, एकट्या, व्याकुळलेल्या वाटेच्याही शोधात असलेले दिसून येतात. अज्ञाताची ओढ लागून तळमळणारी वाटही जीवनात असावी हे सांगत सुखाबरोबर दुःखही जीवनाच्या वाटेवर असणे स्वाभाविक आहे अशी भावना कवी व्यक्त करतात.

दुःख, उदासीनता रामाणींच्या 'कातरवेळ' या संग्रहातला स्थायीभाव आहे हे त्यांच्या काही कवितांमधून दिसून येते. 'खिन्न खेळते नजर' ही त्यांची अशीच एक कविता आहे. 'खिन्न खेळते नजर' या कवितेत कवी म्हणतात की रात्र ही वैरीण आहे. दुःखाचे गाठोडे खुले करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. या रात्री मुळे मनातही अंधार साचलेला आहे. या अंधारात भविष्यही लुळे पांगळे झाल्याचे आपल्याला दिसते अशी निराशावादी भावना कवी व्यक्त करतात. जीवनाची वाट चुकल्याने आलेली निराशा व उदासीनता कवी 'वाट' या कवितेत व्यक्त करतात. आपली वाट वेगळी असल्याचे आपणास कळते पण आता योग्य वाट निवडणे शक्य नाही असे कवी म्हणतात. आपण चुकलेल्या वाटेवर सांजेपरी थकलो आहे. दुःख साचले आहे असे कवी म्हणतात. 'काळ रात्र झाली मीरा' या कवितेत काळ रात्रीचे वर्णन कवी करतात. काळोखाचे विष पिऊन ती काळोखी झालेली आहे. रात्रीच्या स्तब्धतेचे चित्र मानवी मनोवस्थेकडे जोडण्याच्या प्रयत्नात कवी दिसतात. उदासीन भाव व्यक्त करणारी 'ठाव' या कवितेत शांत निश्चल मनावर उमटणाऱ्या उदासीन भावनांना संथ शांत डोहावर उठणाऱ्या वर्तुळाची उपमा कवी देतात. रात्र आणि मौन हे समीकरण त्यांच्या बऱ्याच कवितांमध्ये दिसून येते. 'तुझिया रात्रीला' या कवितेत 'नक्षत्रस्नेहांत तेवतें अंबर' [२३] असे म्हणत रात्रीचे सौंदर्य वर्णनही करतात. 'तुझिया रात्रीला मौनाचें मखर' [२४] अशी सुंदर प्रतिमा ते कवितेत निर्मितात. 'ओढ' या कवितेत आपल्या आयुष्यातच अवेळी सांज दाटल्याचे कवी सांगतात. आपल्या त्या एकाकी अवस्थेला थरथरणाऱ्या ज्योतीची उपमा देतात. वादळ संपले आहे आणि व्यथा असह्य झाल्याची भावना कवी व्यक्त करतात. या अवस्थेत कुणाची तरी अवेळी ओढ त्यांना जाणवते. अवेळी रात्र दाटलेली आहे ज्यास शब्दात व्यक्त करता येत नाही असे कवी म्हणतात. सांज, तिन्हीसांज, रात्र या प्रतिमांचा वापर

प्रामुख्याने उदासीनता व्यक्त करण्यासाठी कवी करतात. या प्रतिमेच्या वापरातही पुनरावृत्तीचा दोष आपल्याला दिसून येतो. याविषयी ल. ग. जोग लिहितात, 'ह्या कवीच्या प्रतिमानिर्मितीलाही असाच एकसांचीपणा आहे. एकाचसारखें दुसरें काव्य एकदम वाचलें कीं, पुष्कळदां मूळचा एखादा गुण दोषरूप होऊं लागतो.'[२५]

निसर्गरूपातून मानवी मनाचा वेध घेण्याचा प्रयत्नात त्यांची विलक्षण अशी आत्मकेंद्रितता दिसून येते आणि त्यामुळे सामाजिक जाणीवेपासून ही कविता दूर जाते. समकालीन दिलीप चित्रेसारख्या कवींच्या कवितेतून प्रबळ आत्मनिष्ठा व्यक्त होते, पण ती आत्मनिष्ठा कवींच्या भिन्न जीवनानुभवांना अनुसरून व्यक्त होते. तसेच त्यांच्या कवितेत आत्मनिष्ठ पद्धतीने सामाजिक आशय, महानगरीय संवेदना कवी व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात जे रामाणींच्या कवितेमध्ये दिसत नाही. रामाणींच्या कवितेत आत्मनिष्ठ स्वरुपाची उदासीन भावना प्रबळ होताना जाणवते. त्यांची स्वतःचीच अशी भाववृत्तीच दिसून येते. पु. शि. रेगे याविषयी लिहितात, 'अधून-मधून कुठली तरी वेदना, व्यथा तिला घाबरी करते, पण तीही अशी उत्कट नाहीं कीं जिच्यामुळें तिचें जीवन उन्मळून पडलें आहे, उमटून पडलें आहे. ज्या मर्यादांच्या कक्षेत ती वावरते त्या तिला जाचक झाल्या आहेत असेंहि भासत नाहीं. या कवितांचे मुख्य यश तिच्या मर्यादशीलतेंत आहे.'[२६] कवयित्री अरुणा ढेरे यांना अत्यंत प्रांजळपणे लिहिलेल्या एका दीर्घ पत्रात कवी शंकर रामाणी आपल्या सुरुवातीच्या कवितेविषयी लिहितात, "सातोस्कारांनी 'कातरवेळ' (१९५९) काढला. त्याच्यावरही डिफिकल्ट वाटण्याइतकी टीका झाली. तो संग्रह मुळीच चांगला नव्हता, तरी पण पु. शि. रेग्यांच्या प्रस्तावनेमुळे माझ्या कवितेचे तीन तेरा वाजले. एक मात्र खरे, माझ्या कवितेत माझा स्वतःचा असा सूर अजिबात नव्हता; होती ती वरवरची सफाई. त्यामुळे कविता वरवर वाचताना बरी वाटायची पण तिचे अंतरंग अतिशय उथळ होते आणि अखेर माझ्या काव्यानिष्ठेला अचानक पंख फुटले."[२८] रामाणींच्या कवितेच्या मर्यादांमध्ये कवितेचे यश जाणवत नाही, कवितेच्या मर्यादतशीलतेत कवितेतील दोषच जाणवतात, पण कवितेच्या भावकाव्यात्म स्वरुपात कवितेचे यश असल्याचे जाणवते. 'कातरवेळ' या संग्रहापुढची त्यांची कविता बहरलेली दिसून येते. एके काळी रामाणींच्या कविता साभार परत करणाऱ्या श्री. पु. भगवतांनाही रामाणींच्या बहरत चाललेल्या काव्यसामर्थ्याची जाणीव होऊन संग्रहरुपात त्यांच्या पुढच्या कविता प्रसिद्ध केलेल्या दिसून येतात.

**निष्कर्ष :**

कवी आपल्या प्रियाच्या बाह्य सौंदर्याच्या चित्रणाबरोबर तिच्याविषयी असलेली आंतरिक ओढही वेगवेगळ्या कवितांमधून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात.

उदासीनता दूर सारण्यासाठी कवींच्या आयुष्यात असलेले तिचे स्थान कवितांमधून अधोरेखित होते.

स्त्री सौंदर्याचे वर्णन करताना बरीच साम्यस्थळे त्यांच्या कवितांमधून दिसून येतात.

'कौल', 'माड' या प्रादेशिक स्वरूपाच्या प्रतिमांचा वापर वारंवार होताना दिसून येतो.

कवी निसर्ग प्रतिमांचे मानवीकरण करत मानवी मनोवृत्तीवर भाष्य करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

रात्रीवर मात करत प्रकाशमानतेकडे चालणारी वाट दर्शवणाऱ्या प्रवासासाठी 'रात्र' या प्रतिमेचा वारंवार वापर होताना दिसून येतो. यातून आशावादी भूमिका कवी व्यक्त करताना दिसून येतात.

रात्र आणि मौन किंवा एकांत हे समीकरण त्यांच्या बऱ्याच कवितांमध्ये दिसून येते, तसेच रात्रीचे सौंदर्य वर्णनही ते करतात.

'सांज', 'तिन्हीसांज', 'रात्र' या प्रतिमांचा वापर प्रामुख्याने उदासीनता व्यक्त करण्यासाठी कवी करतात. या प्रतिमेच्या वापरातही पुनरावृत्तीचा दोष, एकसांचीपणा आपल्याला दिसून येतो.

आत्मनिष्ठ स्वरूपाची उदासीनता कवी व्यक्त करतात. दुःख, उदासीनता रामाणींच्या 'कातरवेळ' या संग्रहातला स्थायीभाव असल्याचे दिसून येते.

निसर्गरूपातून मानवी मनाचा वेध घेण्याचा प्रयत्नात त्यांची विलक्षण अशी आत्मकेंद्रितता दिसून येते आणि त्यामुळे सामाजिक जाणीवेपासून ही कविता दूर जाते.

पुनरावृत्तीचा दोष एकसारख्याच प्रतिमा प्रतीकांच्या वापरातून, तसेच प्रबळ अशा व्यक्त झालेल्या आत्ममग्नतेतून दिसून येतो.

रचनाकौशल्यामुळे कवितेला लाभलेली नादमयता, भावकाव्यात्मकता हे गुण दिसून येतात.

**संदर्भ सूची :**


१. रामाणी, शंकर. कातरवेळ. मुंबई : बा. द. सातोस्कर – सागर साहित्य प्रकाशन, १९५९. पृ. क्र. आठ.

२. रामाणी, शंकर. रामाणी – शंकर रामाणी यांची समग्र मराठी कविता. संपा. अनुजा जोशी. पणजी : गोवा मराठी अकादमी, २०२२. पृ. क्र. ४.

३. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. चार.

४. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. पाच.

५. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. सहा.

६. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. चार.

७. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. १४.

८. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. पाच.

९. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. आठ.

१०. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. आठ.

११. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. १३.

१२. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. सहा.

१३. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. नऊ.

१४. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. १३.

१५. अहिरे, डॉ. के. के. कविताव्रती कवी – शंकर रामाणी. धुळे : अथर्व पब्लिकेशन, २०११. पृ. क्र. २४

१६. रामाणी, शंकर. तत्रैव पृ. क्र. ११.

१७. रेगे पु. शि. प्रस्तावना, कातरवेळ. मुंबई : बा. द. सातोस्कर – सागर साहित्य प्रकाशन, १९५९. पृ. क्र. नऊ.

१८. अहिरे, डॉ. के. के. तत्रैव पृ. क्र. २०-२१.

१९. रामाणी, शंकर. तत्रैव पृ. क्र. सात.

२०. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. २१.

२१. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. सात.

२२. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. १४.

२३. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. १८.

२४. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. २६.

२५. रामाणी, शंकर. उ. नि. पृ. क्र. २६.

२६. जोग ल. ग., पुरून उरलेलें गांभीर्य व एकसाचीपणा, गोमंतकीय कवी शंकर

रामाणी. संपा. डॉ. के. के. अहिरे. धुळे : अथर्व पब्लिकेशन, २०१२. पृ. क्र. १२२.
२७. रेगे पु. शि. उ. नि. पृ. क्र. नऊ.
२८. एकट्याचे गाणे – कविवर्य शंकर रामाणी यांचे पत्रसंचित संपा. परेश वासुदेव प्रभू. पणजी : गोवा मराठी अकादमी, मार्च २०२२. पृ. क्र. ५९.
२९. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपा. डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, प्रा. रवींद्र घावी. पणजी : गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.
३०. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड दुसरा (मुक्तीनंतरचा कालखंड) संपा. प्रा. एस. एस. नाडकर्णी, डॉ. सोमनाथ कोमरपंत. पणजी : गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, २००३.

■